# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk10@dte org.in Internet :http/www.dte.org.in


क्र.१०/एनजीपी/पदविका प्रवेश प्रकिया/२०१०/ ७४
दि. - 9 MAR 2010

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे.

**विषय :** शैक्षणिक वर्ष २०१०-११ साठी एस.एस.सी. व एच.एस.सी. नंतरच्या पदविका अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया केंद्रिभुत पध्दतीने राबविण्याबाबत...

**संदर्भः-** शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग पत्र क्र. पप्रनि २०१०/(३२/१०)/ तांशि-५ दि. ०४.०३.२०१०

उपरोक्त विषयाचे संदर्भाधीन पत्र कृपया पहावे. त्वरित संदर्भासाठी प्रत सोबत जोडत आहे.

शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासुन एस.एस.सी. व एच.एस.सी. नंतरच्या पदविका अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया केंद्रिभुत पध्दतीने राबविण्यांत येणार असुन शैक्षणिक वर्ष २०१०-११ साठी केंद्रिभुत प्रवेशप्रक्रियेमधुन प्रवेश घेतील, अशाच विद्यार्थ्यांना शासनामार्फत शिक्षण शुल्काची प्रतिपुर्ती करण्यात येईल. तसेच, शासनामार्फत देण्यात येणाऱ्या सर्व सवलतीचा लाभ घेता येईल, असे वरील संदर्भिय पत्रान्वये शासनाने सुचित केले आहे.

तरी, याबाबत आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थाच्या निदर्शनास सदर बाब आणून देण्यांत यावी.

सोबतः- वरीलप्रमाणे

( डॉ. सु.का. महाजन )
प्र.संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

************************************************************************

जा.क्र. तंशि/विकाना/तांशा/२०१०/ 444
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक
दिनांक 10 MAR 2010

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित पदविका
अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या पदविका संस्था,
नाशिक विभाग

२/- त्यांना कळविण्यात येते की,संचालनालयाचे सदर पत्राची नोंद घेउन त्यामधील सूचनेप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ.आर.एस.नायडू)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक

प्रत - प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक
२/- सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

## महाराष्ट्र शासन

क्र. पप्रनि २०१०/(३२/१०)//तांशि-५,
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ४ मार्च, २०१०.

प्रति,
संचालक (तंत्रशिक्षण),
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय : **शैक्षणिक वर्ष २०१०-११ साठी एस.एस.सी. व एच.एस.सी. नंतरच्या पदविका अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया केंद्रिभूत पध्दतीने राबविण्याबाबत.**

संदर्भ : आपले पत्र क्र. १०/एनजीपी/पदविका/प्रवेश/२००९/३२, दिनांक २.२.२०१०.

महोदय,

उपरोक्त विषयावरील संदर्भांकित पत्राला अनुसरुन आपणास असे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून एस.एस.सी. व एच.एस.सी. नंतरच्या पदविका अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया केंद्रिभूत पध्दतीने राबविणे सक्तीचे करणे आवश्यक असून शैक्षणिक वर्ष २०१०-११ साठी तयार करावयाच्या प्रवेशप्रक्रिया नियमावलीमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी जे विद्यार्थी केंद्रिभूत प्रवेशप्रक्रियेमधून प्रवेश घेतील, अशाच विद्यार्थ्यांना शासनामार्फत शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येईल. तसेच, शासनामार्फत देण्यात येणा-या सर्व सवलतींचा लाभ घेता येईल, ही अट पूर्वीप्रमाणेच समाविष्ट करुन स्वयंस्पष्ट प्रवेशप्रक्रिया नियमावलीचे प्रारुप शासनास मान्यतेसाठी विहित वेळेत सादर करण्यात यावे, ही विनंती.

आपला,

(व्यं. ह. कुलकर्णी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

५/३/१०

**प्रत :**
संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, बांद्रा (पूर्व), मुंबई -५१.
निवडनस्ती/तांशि-५/प्रवेशप्रक्रिया निवडसंग्रह.

C:\Documents and Settings\Administrator\My Documents\Lole\TE\Letter\Mig.doc